## वादपत्र दुरुस्ती अर्ज निशाणी क्रमांक ६७ खालील आदेश
## (पारीत दिनांक १२.११.२०२४)

प्रस्तूतचा अर्ज वादीने *दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ चा आदेश ०६ नियम १७* अनुसार वादपत्रामध्ये दुरुस्ती करण्यासाठी दाखल केला.

**०२**. वादीने कथन कले आहे की, दावा टंकलिखीत करताना प्रतिवादी क्र. २ ते ४ चे वडिलांचे नाव चुकिने गोपाल ऐवजी नामदेव लिहिण्यात आले. त्या संदर्भात दावा कलमांमध्ये दुरुस्ती करण्याची विनंती केली आहे. सदर दुरुस्तांमुळे मुळ दाव्याच्या स्वरुपात कसल्याही प्रकारचा बदल होणार नसल्याचे कथन केले आहे. सबब अर्ज मंजूर करावा अशी विनंती वादीने केली आहे.

**०३**. सदर अर्जावर प्रतिवादीने म्हणणे दाखल केले नाही. अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

**०४**. वादीने वादपत्रामध्ये सदर दुरुस्तीमुळे न्यायदानासाठी मदत होणार आहे असे कथन केले आहे. तसेच त्याने नमुद केलेल्या दुरुस्त्यांमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही अथवा त्यामुळे प्रतिवादींच्या हक्कांना बाधा येणार नाही. म्हणून अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश.

## आदेश

१. वादीचा अर्ज **नि.क्र.६७** हा रू. २००/- खर्चापोटी मंजूर करण्यात येतो.

२. वादीने वादपत्रात प्रस्तावीत दुरुस्ती १४ दिवसांत करुन वादपत्राची एकत्रीत प्रत व हुकूमनाम्यासाठी वादपत्राची दुय्यम प्रत दाखल करावी.

३. वादीने प्रतिवादीस उपरोक्त खर्च देयवावा.

Digitally signed by PARAG PHADNIS AWATE
Date: 2024.11.12 17:33:05 +0530

**( श्री. आवटे पी. पी.)**

दिनांकः– १२.११.२०२४. सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, औसा.

ठिकाण – औसा. जिल्हा लातूर.